१५
९६
सगणक कक्ष

**वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट**

**अंक २६ वा**

**दिनांक २२/०६/२०२० ते दिनांक २६/०६/२०२०**

**पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.**

**जावक क्रमांक :-** 3753 **दिनांक :-** 13 JUL 2020

---

**भाग- १ :-**

**बदली :- निरंक**

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :- निरंक**

**भाग-२ :-**

**रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पी-६७(१)/पोशि-३३१, संदीप/रजा कालावधी/३३२८/२०२० वाशिम दिनांक :- २४/०६/२०२० अन्वये पोशि/३३१, संदीप लक्ष्मणराव चंद्रशेखर, नेमणुक जिल्हा विशेष शाखा, वाशिम येथे नेमणुकीस असतांना दिनांक २९/०७/२०१९ रोजी कर्तव्यावर येत असतांना त्यांचा अपघात झाल्याने ते दिनांक २९/०७/२०१९ ते २३/०८/२०१९ पर्यत कर्तव्यावर गैरहजर होते. त्यांनी औषधोपचार करुन औषधोपचाराचे कागदपत्रासह त्यांना पोलीस उपअधिक्षक, (मुख्यालय) यांचे समक्ष दिनांक २३/०८/२०१९ रोजी कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत आले होते. नमुद पोशि/३३१, संदीप लक्ष्मणराव चंद्रशंखर, नेम. जिवीशा यांना दिनांक २३/०८/२०१९ चे म. पुर्व कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत आले असुन सदर पोशि यांनी सादर केलेल्या औषधोपचारांचे कागदपत्रासवरुन त्यांचा रजा/गैरहजर कालावधी दिनांक २९/०७/२०१९ ते २३/०८/२०१९ **पर्यत २५ दिवस परावर्तीत रजा** मंजुर करण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-/मसपोनि.पुष्पलता वाघ/ अर्जित रजा/२०२०/३३३४ वाशिम दिनांक :- २४/०६/२०२० अन्वये मसपोनि. पुष्पलता वाघ, नेमणुक पो.स्टे. मालेगांव यांना त्यांनी केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने स्वत: चे कामाकरिता ३० दिवस अर्जित रजा ही रजेवर सोडल्याच्या दिनांकापासुन मंजुर करण्यात येत आहे. सदर अधिकारी यांनी रजा वाढवु नये. रजेवरुन वेळेवर परत योवे. तसेच रजेवर सोडल्याचा व रजेवरुन कर्तव्यावर हजर झाल्याचा दिनांक व वेळ तात्काळ या कार्यालयास कळवावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/रोखीकरण /पो.अधिकारी/३३४१/२०२० वाशिम दिनांक :- २५/०६/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे १५ दिवसांचे रजा रोखीकरण मंजुर करण्यात येत आहे. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोल-५ ब, दिनांक २७/०२/२००४ अन्वये पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पदापर्यतच्या पोलीस अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी एक वित्तीय वर्षात १५ दिवसांच्या अर्जित रजेच्या प्रत्यार्पणास शासनाने मंजुरी दिली आहे. तसेच महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचेकडील पत्र क्रमांक एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोली-५ ब, दिनांक १०/०४/२००७ अन्वये रजा

उपभोगण्याची आवश्यकता नसल्याने खालील नमुद पोलीस अधिकारी यांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पित करुन रोखीकरणास मंजुरी देण्यत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकार पदनाम, नांव व नेमणुक | रजेचा तपशिल | वेतनस्तर मधील मुळवेतन |
|---|---|---|---|
| १. | रापोनि. संजय क्षिरसागर, पोलीस मुख्यालय वाशिम. | १५ दिवस रजा रोखीकरण | रु. ५७,०००/- |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि-३/पोना-८९८/ सिक हजर/३३७९/२०२० वाशिम दिनांक :- २६/०६/२०२० अन्वये पोना/८९८, संदिप रुस्तम जाधव नेमणुक पो.मु. वाशिम हयाची दिनांक ०७/०५/२०२० ते २६/०६/२०२० पावेतो ५१ दिवसाचा सिक कालावधीची खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

**१)** दिनांक ०७/०५/२०२० ते दिनांक ११/०५/२०२० पावेतो ०५ दिवस " **अर्जित रजा** "

२) दिनांक १२/०५/२०२० ते दिनांक २६/०६/२०२० पावेतो ४६ दिवस " **विनावेतन रजा** " मंजुर करण्यात येत आहे. एकुण ५१ दिवस

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/मपोउपनि. सविता वडडे/अर्जित रजा/२०२०/३३८२ वाशिम दिनांक २६/०६/२०२० अन्वये मपोउपनि. सविता साहेबराव वडडे, नेमणुक पोस्टे. मानोरा यांना त्यांनी केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने स्वत:चे लग्नाकरीता १५ दिवस अर्जित रजा ही रजेवर सोडल्याच्या दिनांकापासुन मंजुर करण्यात येत आहे.

**परवानगी :- निरंक**

**भाग -३ :-**

**बढती :- निरंक**

**पगार:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा -१/सपोनि. पदोन्नती./ वेतननिश्चिती/३३०६/२०१९ वाशिम दिनांक :- २३/०७/२०२० अन्वये मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे आदेश क्र. अप/कक्ष-३/पोउपनि. ते सपोनि.पदोन्नती /४७६५/२०१९, दिनांक २५/११/२०१९ व २२६८/२०१९ दिनांक ३०/१२/२०१९ अन्वये खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक हयांची सहायक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर वाशिम जिल्हयात तात्पुरती नेमणुक करण्यात आली आहे. तरी त्यांची म.ना.सेवा वेतन नियम १९८१ व महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारीत वेतन ) नियम २०१९, दिनांक २०/०२/२०१९ मधील नियम क्र १० आणि १३ मधील सुधारित वेतनं मॅट्रीक्स स्तरमधील सेलनुसार पदोन्नतीच्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकपासुन वेतननिश्चीती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | सुधारित वेतन मॅट्रिक्स वेतनस्तर |
|---|---|---|
| १. | पोलीस उपनिरीक्षक | एस-१४ रु. ३८६००-१२२८००/- |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | एस-१५ रु. ४१८००-१३२३००/- |

| अ.क्र. | पोलीस अधिकारी पदनाम व नाव | पोउपनि पदातील सुधारित वेतनसंरचनेतील वेतनस्तर S-१४ मागील वेतन व दिनांक | पोउपनि कनिष्ठ पदात वेतनस्तर S - १४ मध्ये एक वेतनवाढ दिल्यानंतर होणारे वेतन | सपोनि पदातील S -१५ वरिष्ठ वेतन स्तरामधील वेतन वरिष्ठ पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासुन प्रत्यक्ष लाभ |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | सपोनि. संदीप बापुराव नरसाळे | ०१/०७/२०१९ रु. ४६१००/- | रु.४७५००/- | २२/११/२०१९ रु. ४८५००/- |
| २. | सपोनि. महेश देवसिंग मछले | ०१/०७/२०१९ रु.४६१००/- | रु.४७५००/- | २३/१२/२०१९ रु. ४८५००/- |

**भाग -४ :-**

**बक्षिस:- निरंक**

**भाग -५ :-**

**शिक्षा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोआवा/विचौ/पी-६७(१)सपोनि सागर दानडे/ अंतिम आदेश/३३३५/२०२० वाशिम दिनांक :- २४/०६/२०२० अन्वये सपोनि सागर दानडे, नेमणुक पोस्टे वाशिम शहर यांना त्यांच्या उक्त कसुरीकरीता कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेमध्ये अशंत: बदल करुन **पुढील देय वार्षिक वेतनवाढ ०१ (एक) वर्षाकरीता रोखणे.( पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी )** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोआवा/विचौ/पी-६७(१)/पोहवा-४९६, मारुती/ अंतिम आदेश/३३३६/२०२० वाशिम दिनांक :- २४/०६/२०२० अन्वये पोहवा/४९६, मारुती निवृत्ती भवाळ, नेमणुक पोस्टे वाशिम शहर यांना त्यांच्या उक्त कसुरीकरीता कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेमध्ये अशंत: बदल करुन " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ ०१ (एक) वर्षाकरीता रोखणे.( पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी )** " ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**निलंबन :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:पोअवा/विचौ/पी-६७(१)/नापोशि-८५३, सचिन गायकवाड/अंतिम आदेश/२९५१/२०२० वाशिम दिनांक :- १२/०६/२०२० अन्वये नापोशि/८५३, सचिन गायकवाड, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम सध्या नेम. पोलीस स्टेशन मानोरा यांना उपरोक्त कसुरीबाबत ३००० /- रुपये आर्थीक दंड व दिनांक १८/०२/२०२० ते ०४/०६/२०२० पर्यंतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ठेवणे ही शिक्षा कायम करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशखा/पोना-१२३०, अजय धनकर/निलंबन मुक्त/३३५६/२०२० वाशिम दिनांक :- २५/०६/२०२० अन्वये पोना/१२३०, अजय धनकर, नेमणुक पोस्टे आसेगांव यांना त्यांचे कसुरीबाबत या कार्यालयाचे निलंबन आदेश क्रमांक पोअवा/विचौशाखा/पोना-१२३०, अजय धनकर/निलंबन/१२३१/२०२० दिनांक २४/०२/२०२० चे आदेशान्वये त्यांना निलंबीत करण्यात आले होते. सदर नमुद नि. पोना/१२३०, अजय धनकर, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे विरुध्दचे प्राथमिक चौकशी प्राप्त झालेली असलयाने त्यांना सदर चौकशीच्या अधिन राहुन निलंबनातुन मुक्त करण्यांत येत असुन त्यांची नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम येथे करण्यांत येत आहे. त्यांच्या निलंबन कालावधीबाबतचा निर्णय प्राथमिक चौकशी/खातेनिहाय शिस्तभंग विषयक कारवाईच्या अधिन राहुन स्वतंत्र आदेशाव्दारे यथावकाश निर्गमित करण्यांत येईल.

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण व इतर :-**

प्रशिक्षण:- निरंक

इतर. :-

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:पोअवा/आशा-४/श्वान पथक/श्वान खाद्य/देयक/माहे मे-२०२०/मंजुर/२०२०/३२८८ /वाशिम दि.:- २२/०६/२०२० अन्वये श्वान पथक वाशिम येथील श्वानांचे माहे मे -२०२० चे **औषध व खाद्य बिल देयक एकुण रुपये रक्कम रु. १०,१९४/-( दहा हजार एकशे चौऱ्यानऊ रुपये फक्त ) चे पत्र या कार्यालयात प्राप्त झाले आहे. सन २०२०-२०२१ चे वित्तीय वर्षामध्ये इतर खर्च** या उपलेखाशिर्षाखाली मंजुर करण्यात येत आहे. उपरोक्त खर्च हा सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षा मधील २०५५-०१६८(५०) **इतर: खर्च** याउददीष्टाखाली प्राप्त होणा-या अनुदानातुन भागविण्यात यावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :पोअवा/पशा-५/कश्रेली हरिमकार कार्यभार/वश्रेली. वानखडे/३२९३/२०२०, वाशिम दिनांक : २२/०६/२०२० अन्वये या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-०१/कश्रेली हरिमकार/नेमणुक/२१४२/२०१९ दिनांक :- ०८/०३/२०१९ अन्वये कश्रेली प्रविण प्र. हरिमकर, नेम. विचौ शाखा यांची पत्रव्यवहार शाखा ( लिपीक वर्गीय आस्थापना ) येथे नेमणुक करण्यांत आलेली होती. तथापी या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-५/वश्रेली-मस्के/बदली/कार्यमुक्त/२४६६/२०२० दिनांक १५/०५/२०२० अन्वये श्री. अशोक मस्के नेमणुक इमारत लिपीक यांना बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त केल्याने त्यांच्याकडील इमारत लिपीक यांना बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त केल्याने त्यांचेकडील इमारत लिपीक पदाचा कार्यभार श्री पंडीत यशवंत गवई यांचेकडे सोपविण्यांत आलेला असुन त्यांचेकडील विभागीय चौकशी शाखेचा कार्यभार कश्रेली प्रविण हरिमकार यांचेकडे सोपविण्यात आला आहे. सदर आदेशाव्दारे उपरोक्त नेमणुकीच्या आदेशात अंशत: बदल करण्यात येत असुन कश्रेली प्रविण प्र . हरिमकार यांचेकडील लिपीक व चतुर्थ श्रेणी कर्मचारी आस्थापनेचा अतिरीक्त कार्यभार वश्रेली श्री सुधीर वानखडे, नेमणुक अधिकारी आस्थापना यांचेकडे सोपविण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:पोअवा/पशा-२/अधिकारी निवासस्थन वाटप/३३२०/२०२०, वाशिम दिनांक २३/०६/२०२० अन्वये या कार्यालयाचे आदेश क्र. पोअवा/पशा-२/अधिकारी निवासस्थान वाटप/३०१९/२०२० दिनांक १६/०६/२०२० अन्वये पोउपनि चंदन रमेशराव वानखडे नेमणुक नियंत्रण कक्ष, वाशिम यांना १७२ शासकिय निवासस्थान वसाहतीमधील टाईप III मधील निवासस्थान क्रमांक ११ वाटप करण्यात आले होते. परंतु त्यांनी विनेती अर्ज देवुन सदरचे निवासस्थान नादुरुस्त असल्याने त्याऐवजी निवासस्थान क्रमांक ९ देण्याबाबत विनंती केली होती. करीता पोउपनि चंदन रमेशराव वानखडे नेमणुक नियंत्रण कक्ष, वाशिम यांना १७२ शासकिय निवासस्थान वसाहतीमधील टाईप III मधील निवासस्थान क्रमांक ११ ऐवजी निवासस्थान क्रमांक ९ हे वाटप करण्यात येत आहे. इतर निर्देश दिनांक १६/०६/२०२० च्या आदेशाप्रमाणेच राहतील.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-१/संगणक कक्ष/समन्वय अधिकारी/माहिती/२०२०/३३६१ वाशिम दिनांक :- २५/०६/२०२० अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व व्हॉटस ॲप क्रमांकाची एकत्रीत अदयावत माहिती पाठविणेबाबत महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचरी यांच्या ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व व्हॉटस ॲप क्रमांकाची एकत्रीत अद्यावत माहिती करिता समन्वय अधिकारी याची नेमणुक करावी व त्यांचे नाव, हुददा, ईमेल आयडी, मोबाईल व व्हॉटस ॲप क्रमांकाची माहिती सादर करावी असे सुचीत केले आहे. त्या अनुषंगाने वाशिम पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व व्हॉटस ॲप क्रमांकाची एकत्रीत अदयावत माहिती करिता समन्वय अधिकारी म्ळणुन निवड केलेल्या पोलीस अधिकारी यांची माहिती विहीत नमुन्यात खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| पोलीस अधिकारी यांचे नाव | हुददा | ईमेल आयडी (EEMAIL ID) | मोबाईल क्रमांक | व्हॉटस ॲप क्रमांक |
|---|---|---|---|---|
| श्रीराम गणपत घुगे | पोलीस निरीक्षक | Shriramghuge१९६३@gmail.com | ९८२३१५७०५१ | ९८२३१५७०५१ |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- पोअवा/पशा-१/का.अ.त्रिनगरीवार/कार्यभार/३३४०/२०२० वाशिम दिनांक २५/०६/२०२० अन्वये श्रीमती मंगला एस. त्रिनगरीवार कार्यालय अधिक्षक हया दिनांक २१/०६/२०२० रोजी मंजुर अर्जित रजेवरुन कर्तव्यावर हजर झाल्या आहेत. त्यांचे रजा कालावधीत कार्यालय अधीक्षक या पदाचा प्रमुख लिपीक विनोद झाडे यांचेकडे तसेच आहरण व संवितरण अधिकारी या पदाचा पोनि. श्रीराम घुगे जिवीशा यांचेकडे सोपविण्यात आला होता. श्रीमती मंगला एस. त्रिनगरीवार कार्यालय अधिक्षक हया कर्तव्यावर हजर झाल्याने त्यांचेकडे कार्यालय अधिक्षक तसेच आहारण व संवितरण अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम पदाचा नियमीत कार्यभार सोपविण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-४/पुर्नविलोकन/पोउपनि/बिसंवि/वैद्य.तपासणी/३३५२ /२०२० वाशिम, दिनांक :- २५/०६/२०२० पुर्नवलोकन करण्याकरीता नमुद पोलीस अधिकाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करुन मिळणेबाबत या आस्थापनेवरील नेमणुकीस असलेले खालील नमुद पोलीस अधिकारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ च्या नियम १०(४) व नियम ६५ मधील तरतुदीनुसार शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ वर्षाच्या पलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्ष पुर्ण झाल्यानंतर त्यांची शासन सेवा पुढे चालु ठेवण्याची पात्रापात्रता आजमविण्यासाठी विहीत निकषांच्या आधारे त्यांचे पुनर्विलोकन करुन सुयोग्य व कार्यक्षम अधिकारी/कर्मचारी यांनाच लोकहितास्तव शासन सेवेत पुढे चालु ठेवावे व अकार्यक्षम तसेच संक्षयास्पद सचोटी असणाऱ्या अधिकार आणि कर्मचाऱ्यांना मुदतपुर्व सेवानिवृत्त करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दिनांक १०/०६/२०१९ च्या शासन निर्णयात तरतुद विहीत करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन खालील नमुद पोलीस अधिकारी पोलीस दलात हे शारिरीक दृष्टया सेवेमध्ये राहण्यास पात्र आहेत काय? याबाबत नमुद कर्मचारी यांची संपुर्ण वैद्यकीय तपासणी आपणाकडुन होणे आवश्यक आहे. याबाबत त्यांची संपुर्ण वैद्यकीय तपासणी आपल्याकडुन होवुन त्यांचा वैद्यकीय अहवाल त्यांचेकडे देण्यात यावे हि विनंती. जेणेकरुन त्यांची तशी माहिती वरिष्ठांना पाठविता येईल.

**पोलीस उपनिरीक्षक ( बि.सं.विभाग ) संवर्गातील वयाची ५०/५५ वर्ष किंवा सेवची ३० वर्ष पुर्ण झालेल्या अधिकाऱ्यांची यादी**

| अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक यांचे पूर्ण नाव | नेमणुकीचे ठिकाण | जन्मतारीख | भरती तारीख | ५०/५५ वर्ष पूर्ण केल्याचे दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री बिरसिंग प्रतापसिंग सोळंके (वाह) | बिनतारी संदेश विभाग, वाशिम. | ०१/०७/१९६५ | ११/११/१९८८ | ०१/०७/२०१९ वयाची ५४ वर्ष/३० वर्ष सेवा पुर्ण |
| २. | श्री राजेश पुरुषोत्तम नारळे (अभि.) | बिनतारी संदेश विभाग, वाशिम. | २८/०४/१९६९ | १०/०९/१९८८ | २८/०४/२०१९ वयाची ५० वर्ष/ ३० वर्ष सेवा पुर्ण |

२/- तसेच वैद्यकीय तपासणीचे संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवंच्या सर्वसाधारण शर्ती )१९८१ मधील तरतुदी तसेच शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदी लागु होतील. याशिवाय वैद्यकीय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रात आंधळेपणा, वर्णांधंतेपणा, गुडघ्यास गुडघा लावणे सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग, तोतरेपणा व एडस या

चाचाण्यांचा समावेश असेल, वर नमुद उमेदवार यांची संपुर्ण वैद्यकीय तपासणी पुर्ण करून त्यांचा वैद्यकीय अहवाल नमुद कर्मचारी यांचेजवळ देण्यास विनंती करण्यात येत आहे. जेणेकरुन नमुद कर्मचा-यांचे पुर्नविलोकन करणे सोयीचे होईल.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/का.क्रं.१६/निधन-पोहवा, (ब.न.७०९)/३३८१/२०२०, वाशिम दिनांक :- २६/०६/२०२० अन्वये पो.स्टे. कारंजा ग्रामीण येथे तैनातिस असलेल पोहवा/७०९, कैलास रामधन राठोड हे सिक मध्ये असतांना त्यांचे हृदयविकार झटक्यांने दिनांक २५/०६/२०२० चे सकाळी ०३:०० वाजताच्या दरम्यान त्यांचे निधन झाले आहे. पोहवा/७०९, कैलास रामधन राठोड यांचे हृदयविकाराच्य झटक्यांने दि. २५/०६/२०२० चे सकाळी ०३:०० वाजता दरम्यान निधन झाल्याने त्यांचे नांव वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दि. २५/०६/२०२० रोजी मा. पुर्व पासुन कमी करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/ले. शा./पेंशन/ओरीएन्टल विमा क्लेम/०२ कर्म/३३७८ वाशिम दिनांक :- २६/०६/२०२० अन्वये या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद मयत पोलीस कर्मचारी यांचे दि. ओरिएन्टल इंश्योरेन्स कंपनी लिमीटेट , पुणे यांचे दिनांक ०९/०६/२०२० रोजी प्राप्त ई-मेल नुसार, प्राप्त विमा दाव्याची रक्कम त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे नमुद कुटुंबीय वारसदार यांना संबंधीत पो.स्टे. मार्फत अदा करण्यात यावी.

| अ.क्र. | मयत कर्मचारी नाव/पद | मयत कर्मचारी यांचे नामनिर्देशीत केलेले वारस | विमा दयावयाची रक्कम | विमा दयावयाची रककम जमा तपशील | झाल्याच |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | पोंहेकॉ/५३२, शिवचंद्र बाबुसिंग राठोड नेम.पो.स्टे.मानोरा. | श्रीमत माधुरी शिवचंद्र राठोड ( मयतकर्मचारी यांची पत्नी ) | १०,०००००/- | UTIBR५२०२००३१७००३३००८० DATE-१८-०३-२०२० | PA TO SUPDT OF POLICE WASHIM |
| ०२. | पोकॉ/४६१, पुरषोत्तम विठ्ठलराव ठाकरे नेम. पो.स्टे. धनज. | श्रीमती सारिका पुरुषोत्तम ठाकरे (मयतकर्मचारी यांची पत्नी ) | १०,०००००/- | UTIBR५२०२००३१७००३३००७९ DATE-१८-०३-२०२० | PA TO SUPDT OF POLICE WASHIM |

या कार्यालयाचे जावक क्रमांक ३३१० दिनांक २३/०६/२०२० अन्वये वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट अंक क्रमांक २४ वा दि. ०८/०६/२०२० ते दि. १२/०६/२०२० हा प्रसिध्द करण्यात आला आहे.

**( वसंत परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक २६ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

-----०००००-----